**<u>रे.दि.मु.क्र. १४६/२०१६ मधील निशाणी ३१, ३३ व ३५ वरील एकत्रित आदेश</u>**

(CNR NO.MHST-070009022016)

नारायण ज्ञानू मस्तके ––– वादी

वि.

तुकाराम ज्ञानू मस्तके ––– प्रतिवादी

सदरहू अर्ज प्रस्तावित वादी यांनी मयत वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब व मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर न आणलेने त्यांच्याविरूध्द दावा रद्द झालेबाबतचा आदेश (Abatement) रद्द होवून मिळणेकरीता व मयतांचे वारस अभिलेखावर घेवून त्याबाबत दाव्यात आवश्यक दुरूस्ती करण्याकरीता दाखल केले आहेत. सदर तिन्ही अर्जांच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. प्रस्तावित वादीचे वकीलांनी कथन केले की, वादी नारायण ज्ञानू मस्तके यांचे दि.१३/०८/२०२४ रोजी मयत झाले. सदरचा अर्ज दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रस्तावित वादी यांना कायदयाने ज्ञान नसलेने व मृत्यूउतारा दाव्याचे कामी दाखल करणे याची माहिती नसल्याने मयताचे वारसांना विहित कालावधीमध्ये अभिलेखावर घेण्याची तजवीज करता आली नाही. दावा चालविण्याकरीता अबेटमेंटचा आदेश रद्द करून सदरचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली. प्रतिवादीचे वकीलांनी कथन केले की, सदरहू अर्ज खोटा, लबाडीचा आहे. करीता, अर्ज फेटाळण्याची विनंती केली. यदाकदाचित, अर्ज मंजूर करणेचा झालेस रू.५,०००/– खर्चावर मंजूर करणेची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी नारायण ज्ञानू मस्तके यांचे दि.१३/०८/२०२४ हे मयत झाल्याबाबतचे मृत्यूउतारा दाखल केला आहे. त्यामुळे वादी नारायण ज्ञानू मस्तके हे दि.१३/०८/२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते.

**४.** प्रस्तावित वादी यांना मयत वादी यांचे वारस म्हणून दावा पुढे चालविण्याचा अधिकार प्राप्त होत असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ प्रमाणे त्यांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक आहे. सदरचे अर्ज दाखल करणेस विलंब झालेला आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. वादीचा झालेला विलंब जाणीवपूर्वक असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरचे तिन्ही अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**: आ दे श :**

१. अर्ज (निशाणी क्र. ३१, ३३ व ३५) मंजूर करण्यात येते.

२. मयत वादी यांचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत आहे.

३. वादी यांच्याविरूध्द वारस मुदतीत अभिलेखावर न आणलेने त्यांच्याविरूध्द दावा रद्द झालेबाबतचा आदेश (Abatement) रद्द करण्यात येत आहे.

४. मयत वादी यांचे वारसांना दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत समाविष्ठ करावे.

५. प्रस्तावित वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

६. मयत वादी यांचे वारसांना नोटीस काढण्यात यावी.

७. सदरील अर्जांचा खर्च अंतीम आदेशास अनुसरून राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2025.09.02 17:12:53 +0530

कराड. (श्रीमती ए.व्ही.मोहिते )

दि. ०२/०९/२०२५. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कराड.

ता.कराड, जि.सातारा.